# Dr. देव

डॉक्टर या पेशाबद्दल आपणा सर्वांनाच एक विशेष, शब्दांत व्यक्त न करता येणारा असा आदर असतो. तो का असतो, हे समजून घ्यायचं असेल तर किमान एकदा तरी आजारी पडावं लागतं! अशाच काही दुर्धर आजारातून बचावलेल्यांची ही सत्यकहाणी. डॉक्टरांना लोक देव का मानतात? या प्रश्नाचं उत्तर या सदरातून आपसूकच मिळते...



डॉ. मुकुल दाबोलकर



## अशीही डोकेदुखी...

एअर फोर्समध्ये पायलट म्हणून काम करणारे अमित जोशी डोकेदुखीने हैराण झाले होते. त्यांचं डोकं प्रचंड दुखत होतं, पण कशामुळे ते त्यांना कळतच नव्हतं. डोकेदुखीवरच्या नेहमीच्या गोळ्या, औषधं घेऊनही काही फरक पडत नव्हता. पायलट म्हणून अत्यंत जबाबदारीचं काम या डोकेदुखीमुळे सोडावं लागेल की काय, अशी स्थिती निर्माण झाली होती. सुदैवाने डेंटल अर्थात दातांच्या समस्येमुळेसुद्धा असह्य अशी डोकेदुखी होऊ शकते असा एक लेख त्यांनी एकेठिकाणी वाचला आणि दंतवैद्यकाकडे जाऊन तपासणी करण्याचं त्यांनी ठरवलं.

खरं तर काही दात खराब झाल्यामुळे जोशींनी नवीन दात बसवून घेतले होते, पण हे नवीन दातच आपल्या डोकेदुखीचं कारण असतील असं त्यांना स्वप्नातही वाटलं नव्हतं. इंटरनॅशनल सेंटर फॉर डेंटल केअरचे डॉ. मुकुल दाबोलकर यांनी जेव्हा जोशी यांच्या जबड्याची व दातांची तपासणी केली तेव्हा त्यांना आढळून आलं की, जोशींना योग्य पद्धतीने नवीन दात बसवण्यात आले नव्हते. त्यांनी ते दात काढून पुन्हा नवीन दात बसवले, पण योग्य पद्धतीने. शिवाय दातांची रचनाही चांगली केली. त्यानंतर जोशींना पुन्हा कधी डोकेदुखीने सतावलं नाही.

अनेकदा डोकेदुखीकडे आपण दुर्लक्ष करतो. पण जर डोकेदुखी थांबतच नसेल तर मेंदूत रक्ताची गुठळी किंवा ट्युमर तर झालेला नाही ना, याची तपासणी करून घ्यायला हवी. या चाचण्या नकारात्मक आल्यास म्हणजे तसं काहीही नसल्याचं स्पष्ट झाल्यास व डोकेदुखीला जबाबदार असं दुसरं कुठलंही कारण आढळलं नाही, तर पहिल्यांदा डेंटिस्टकडे जाऊन दातांची संपूर्ण तपासणी करून घ्या.

- दात किंवा हिरड्यांना काही दुखापत झाली असेल किंवा त्यांची योग्य काळजी राखली गेली नसेल तर डोकेदुखी होऊ शकते.
- दंतदुखीवर योग्य वेळीच उपचार केले नाहीत तर असह्य अशी डोकेदुखी होऊ शकते.
- सहसा धूम्रपानासारख्या वाईट सवयी, कामाचा अतिताण यांमुळे जरी डोकेदुखी होत असली तरी अनेकदा तोंडाशी संबंधित आजारांमुळेही डोकेदुखी होऊ शकते. दात खराब झाल्यामुळे मायग्रेन, कानात वेदना होणे किंवा अगदी स्पाँडिलायटीसचा आजारही बळावू शकतो.

तुमची डोकेदुखी दातांमुळे असल्यास पुढील लक्षणं आढळून येतात-

- डोळे, मान, खांदे किंवा स्नायूंना वेदना होतात.
- जबड्याच्या स्नायूंना वेदना होतात.
- दात कराकरा वाजतात.
- कानाला वेदना होतात.
- चक्करल्यासारखे वाटते.
- अक्कलदाढेमुळेही डोकेदुखी होऊ शकते.

विक्रांत काळे
rajavikrant2011@gmail.com